
दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२८
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.२० डिसेंबर २०२४


## राहुल गांधी मागणीवर ठाम ; गृहमंत्री अमित शाह यांनी राजीनामा द्यावाच !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, दिल्ली :** संसदेत राहुल गांधींकडून धक्काबुक्की झाल्याचा आरोप भाजापच्या खासदारांनी केला आहे. प्रताप चंद्र सारंगी यांनी राहुल गांधी यांनी धक्का दिल्याचा आणि त्यामुळे आपण जखमी झाल्याचा आरोप केला आहे. दरम्यान काही वेळापूर्वीच राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषद घेत भूमिका स्पष्ट केलं. मल्लिकार्जुन खरगेंनी त्यांनाच धक्काबुक्की झाल्याचा आरोप भाजपावर केला. त्यानंतर राहुल गांधींनी सविस्तर भूमिका मांडली.

**काय म्हणाले राहुल गांधी ?**

संसदेत अधिवेशन सुरु होण्याआधी काही दिवस अदाणींच्या संदर्भातली अमेरिकेतली केस समोर आली. याबाबत कुठलीही चर्चा करण्यास भाजपाने नकार दिला. अशा प्रकारचा विषय थांबवण्याचा प्रयत्न केला. भाजपाचं धोरण हे होतं की या प्रकरणी कुठलीही चर्चा न होता ते दडपलं जावं. त्यासाठी त्यांनी विविध गोष्टी मधे आणून मुद्दा भरकटवण्याचा प्रयत्न केला. हे घडत होतंच त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बाबासाहेब आंबेडकरांबाबत एक वक्तव्य केलं. आम्ही सुरुवातीपासूनच हे सांगत आहोत की भाजपाची आणि संघाची विचारधारा ही संविधान विरोधी आणि आंबेडकरांच्या विरोधातली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं जे योगदान आहे ते यांना पुसून टाकायचं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांची मानसिकता काय आहे ते त्यांच्या वक्तव्यातून दाखवून दिलं आहे. असं राहुल गांधी म्हणाले.

**राहुल गांधी म्हणाले आम्ही आमच्या मागणीवर ठाम आहोत**

राहुल गांधी पुढे म्हणाले, आम्ही हे सांगितलं होतं की अमित शाह यांनी राजीनामा द्यावा, माफी मागावी. मात्र ते केलंच नाही. आज पुन्हा एकदा या लोकांनी विषयांतर करण्याचा सोयीस्कर प्रयत्न केला आहे. आम्ही सगळे खासदार शांततेत संसदेत चाललो होतो. त्यावेळी पायऱ्यांवर दंडुके घेऊन उभे होते. आम्हाला त्यांनी आत जाण्यापासून अडवलं हे वास्तव आहे. आम्ही आमच्या मागणीवर ठाम आहोत की गृहमंत्री अमित शाह यांनी बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला आहे. त्यांनी माफी मागावी आणि पदाचा राजीनामा द्यावा. तसंच मुख्य मुद्दा हा आहे की नरेंद्र मोदींचे मित्र अदाणींचा. त्यांच्याविरोधात परदेशात केस झाली आहे. या गोष्टीपासून लक्ष विचलित केलं जातं आहे, हा मुद्दा यांना दडपून टाकायचा आहे त्यामुळे या सगळ्या गोष्टी सुरु आहेत. असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

## नीलकमल बोट अपघात : बोटीच्या सांगाड्यात मृतदेह सापडला मृतांचा आकडा १४ वर



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, मुंबई :** 'गेट वे ऑफ इंडिया' येथून घारापुरीकडे निघालेल्या प्रवासी बोटीच्या अपघातातील मृतांची संख्या १४ झाली असून गुरूवारी अपघातग्रस्त नीलकमल बोटीच्या सांगाड्यात आणखी एक मृतदेह सापडल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे.

'नीलकमल' ही प्रवासी बोट पर्यटक आणि प्रवाशांना घेऊन घारापुरीकडे जात होती. दुपारी ३.५५ वाजता नौदलाच्या एका 'स्पीड बोटी'ने प्रवासी बोटीला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यामुळे 'नीलकमल' बोटीला भगदाड पडले. त्यातून पाणी आत शिरल्यामुळे बोट बुडू लागली. अपघाताची माहिती मिळताच नौदल, तटरक्षक दल व मुंबई सागरी पोलिसांच्या पथकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. नौदलाच्या ११ नौका, तटरक्षक दलाची एक व यलोगेट पोलीस ठाण्याच्या ३ नौका तसेच स्थानिक मच्छीमार नौकांच्या सहाय्याने मदतकार्य सुरू करण्यात आले. नौदलाच्या चार हेलिकॉप्टरचीही मदत घेण्यात आली. दोन्ही बोटींवर प्रवासी आणि कर्मचाऱ्यांसह असे एकूण ११५ जणांना बचाव कार्यात वाचवण्यात आले. त्यापैकी १३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यातील आठ मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले आल्याचे पोलिसांनी सांगितले. नीलकमल बोटीच्या सांगाड्यात गुरूवारी आणखी एक मृतदेह सापडला. मृत व्यक्ती बोटीतच अडकून पडली होती. मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. अपघातानंतर नीलकमल बोटीतील हंसराज भाटी(४३) व जोसान मोहम्मद निसार अहमद पठाण(७) बेपत्ता आहेत. तटरक्षक दलाच्या बोटी व हेलिकॉप्टरद्वारे त्यांचा शोध घेण्यात आला. कुलाबा पोलिसांनी याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०६(१)), १२५ (अ) (ब), २८२, ३२४ (३)(५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## उप प्रादेशिक परिवहन कल्याण तर्फे बेसिस्त रीक्षा चालकांवर धडक कारवाई



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, डोंबिवली (ठाणे) :** कल्याण डोंबिवली हद्दीमध्ये वाहनांची संख्या आणि कॉंक्रीट करण्याचे काम मुळे वाहतूक कोंडीला समोर जावं लागत. त्याचबरोबर रिक्षंचे संख्या वाढ झाल्याने बेशिस्त रिक्षाचालक व मालक यांचे प्रवासीचें तक्रारही वाढ झाल्याने नागरिक त्रस्त झाले. बेसिस्त रिक्षा चालकांचें मनमानी कारभार पाहून नवीन नियुक्त उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कल्याण आशुतोष बारकुल यांनी दि १९ रोजी आपल्या कार्यालयातील अधिकारी मोटर वाहन निरीक्षक अमित नरवडे, सहाय्यक वाहन निरीक्षक रोहित पवार, विजय नरवडे, मोहित मकवान, प्रियंका सहगावकर आणि नेहल राठोड अशी एक पथक नेमून डोंबिवली पूर्व /पश्चिम परिसरात पाठवले असून ६०/७० रिक्षा तपास करून त्यात ३०/४० रिक्षांवर धडक कारवाई करण्यात आले या कारवाईमध्ये बेशिस्त रिक्षा चालक, मालकांन वर गाड्यांचे योग्य कागदपत्र नसलेले फिटनेस, इन्शुरन्स, लायसन व बॅच असे रीक्षांवर पाच ते वीस हजार असे दंडात्मक कडक कारवाई करण्यात आले. या कार्यावही मध्ये डोंबिवली पूर्व पश्चिम या ठिकाणी रस्तंनी मोकळे श्वास घेताना नजारे दिसून आले. अशी कारवाई व तक्रार आल्यास यापुढेही चालू राहण्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन बारकुल यांनी दिले.

## आ.दातेंनी विधानसभेत मांडले जिल्हाळ्याचे प्रश्न ! ४० वर्षाच्या प्रदीर्घ अनुभवाची घडली झलक!




**पठार भागाचा पाणी प्रश्न विधानसभेत मांडला!**

शासनाने पश्चिम घाटावर पाणी अडवण्याचा प्रयत्न केलाय, माझ्या मतदारसंघाची भौगोलिक परिस्थिती अशी आहे अर्धा मतदारसंघ गोदावरी खोऱ्यामध्ये पाणलोट क्षेत्र आहे आणि अर्धा मुळा, कुकडी क्षेत्रामध्ये आहे. यामध्ये गोदावरी खोऱ्यात आम्हाला कुठलाही नवीन प्रकल्प घेता येत नाही, बंधारा देखील नव्याने घेता येत नाही. पश्चिम घाटाचे पाणी वळवल्यानंतर पाण्याची उपलब्धता होते त्या माध्यमातून आमच्या पठार भागाला दोन टीएमसी पाण्याचा प्रश्न आहे तो सुटण्याची गरज आहे, ते पाणी आम्हाला मिळालं पाहिजे ही आमच्या मतदारसंघाची मागणी आहे

**-आ.काशिनाथ दाते, विधानसभा सदस्य**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** महामहिम राज्यपाल यांचे अभिभाषणावर पारनेर - नगर मतदारसंघातील आमदार काशिनाथ दाते विधानसभेत बोलत होते. महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. विधानसभेत माझे हे पहिलेच भाषण आहे, काल मी औवचित्याच्या मुद्द्यावर दिव्यांग, संजय गांधी योजनेचे अनुदान वितरण व अनुदानात वाढ करणे याबाबत बोललो आहे.

मला मा. राज्यपालांच्या अभिभाषनावर बोलण्याची संधी मिळाली त्यामुळे माझ्या मनात एक वेगळे समाधान आहे. मला येथे बोलण्याची संधी मिळाली ते माझे पारनेर - नगर मतदारसंघातील जनतेचे व मतदारांचे सर्वप्रथम मी आभार मानतो. त्याचबरोबर माझे नेते माननीय अजित दादा पवार, महायुतीचे सर्वेसर्वा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, एकनाथजी शिंदे साहेब आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांचे आभार मानतो. माझ्या आई-वडिलांच्या आशीर्वादामुळे इथपर्यंत पोहोचू शकलो, माझ्या वडिलांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करतो. कोणताही व्यक्ती माता पिता गुरुजनांशिवाय घडू शकत नाही त्यामुळे माझ्या गुरुजनांनाही वंदन करतो. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या या मंदिरास अभिवादन करून माझ्या भाषणाला सुरुवात करत आहे.

मा. राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात महायुतीच्या सरकारने जे काही लोकाभिमुख निर्णय घेतले त्या ६२ मुद्द्यावर अभिभाषण झाले. परंतु मी माझ्या मतदारसंघातील निगडित ज्या मुद्द्यावर संबंध येतो त्याच मुद्द्यावर बोलणार आहे. खऱ्या अर्थाने औद्योगिक क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. १४ टक्के पेक्षा अधिक देशांतर्गत उत्पादनात भर पडली आहे. परकीय गुंतवणूक देखील ९०% पर्यंत वाढली आहे. या गुंतवणुकीच्या संदर्भात माझ्या मतदारसंघातील सुपा ही एमआयडीसी येते, ही मध्यवर्ती ठिकाणी एमआयडीसी आहे येथे खूप आंतरराष्ट्रीय उद्योजक आलेले आहेत. परंतु गेल्या काही वर्षापासून या एमआयडीसी मध्ये स्थानिकांना रोजगार दिला जात नाही. परकीय मोठ्या प्रमाणात आले आहेत त्यांनाच मोठ्या प्रमाणात रोजगार दिला जातो. या कंपन्याभोवती दहशतीचे वातावरण केले जाते, त्याचा दुष्परिणाम या चांगल्या कंपन्यांवर होतोय यामध्ये सुधारणा झाली पाहिजे. एमआयडीसीमध्ये शांतता राहिली पाहिजे जेणेकरून या ठिकाणी नवनवीन उद्योजक येतील.

या ठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारे प्राथमिक सोयी सुविधा आहेत जमीन देखील उपलब्ध आहे. स्थानिकांना आश्वासित केले होते की ज्यांची जमीन एमआयडीसीमध्ये संपादित झाली आहे त्यातील एकाच नोकरी घेतले जाईल परंतु तसं होताना दिसत नाही. ७४८० कि.मी. रस्ते सरकारने प्रस्तावित केले आहे त्यामुळे ग्रामीण भागाकडे ही शासनाचे लक्ष देण्याची गरज आहे. मुख्यमंत्री ग्राम सडक व पंतप्रधान ग्राम सडक योजनेची व्याप्ती वाढवण्याची गरज आहे. त्यामुळे पाचशे ते हजार लोकसंख्येची गावे आपल्याला पक्क्या रस्त्याने जोडता येतील. जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरू करण्याची गरज आहे तसेच दिवसा शेती पंपासवीज देण्याची मागणी पुर्ण करावी यामुळे माझ्या शेतकऱ्यांना रात्रीचे पाणी भरण्यास जाण्याची गरज पडणार नाही.

## गृहमंत्री अमित शहांचे वक्तव्य कामकाजातुन काढून टाकण्याची कॉंग्रेसची मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१९, मुदखेड (नांदेड) :** गृहमंत्री अमित शहांनी देशाच्या संसदेत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या आपत्तीजनक टिप्पणीचा निषेध दिल्लीपासून गल्लीपर्यंत होत असताना संबंधित वक्तव्य संसदेच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशा आशयाचे निवेदन तालुका कॉंग्रेस कमिटी कडून तहसीलदारास देण्यात आले आहे.

कॉंग्रेस तालुका व शहर कमिटीच्या वतीने पक्ष कार्यालयासमोर दि.१९ गुरुवार रोजी गृहमंत्री अमित शाह यांच्या वक्तव्याचा निषेध नोंदविण्यात आला. यावेळी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सरकारच्या विरोधात घोषणा देत डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या समर्थनार्थ उद्घोषणा केल्या. यासंदर्भात कॉंग्रेस पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे,उपाध्यक्ष राजेश चौदंते, माजी नगराध्यक्ष राजबहादूर कोत्तावार, मोहमद गौस, करीम खां साब, गजानन संबोड, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, मोईन खान, गिरीश कोत्तावार, मुजिब पठाण, रमेश बोडके, विनोद चौदंते, मधुकर देवणे, अमोल चौदंते, अज्जगर हुसेन, बालाजी कोलते, बालाजी सूर्यवंशी, ऋषिकेश चौदंते, राधेश्याम ढगे, प्रशांत पाटील मुंगल आदींच्या उपस्थित होती.

## परभणीच्या घटनेच्या निषेधार्थ कॅंडल मोर्चा !




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, पुणे :** परभणी येथे संविधान शिल्प तोडफोडीच्या घटनेनंतर दगडफेक व तोडफोड केल्याप्रकरणी काही आंबेडकरी चळवळीतील युवकांना पोलिसांनी अटक करून न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली होती. यात सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलीस कोठडीतच मृत्यू झाला. या प्रकरणी पक्ष संघटनेच्या वतीने च्या वतीने आनंदराज आंबेडकर यांनी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती.

त्या पार्श्वभूमीवर पुणे ताडीवाला रोड येथे कॅन्डल मार्चचे आयोजन करीत घटनेचा निषेध करण्यात आला. तसेच सूर्यवंशी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.हा कॅन्डल मोर्चा पंचशील चौक मातोश्री रमाबाई आंबेडकर रोड (ताडीवाला रोड) या ठिकाणी अभिवादन करून ताडीवाला रोड चौक येथे समारोप करण्यात आला. या वेळी पोलीस अधिकाऱ्यांची निलंबिनाची मागणी करत शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला शासकीय सरकारी मदत व्हावी . संविधानाची मोडतोड, करणाऱ्यांना पॉलीग्राफी चाचणी करून सूत्रधाराला अटक करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी मा. नगरसेवक लता राजगुरू, प्रदीप गायकवाड, प्रकाश साळवे, ( दलित पॅंथर शहर अध्यक्ष) प्रेम जोगदंड ,दत्ता गायकवाड,राहुल तायडे, बाबा ओव्हाळ ( बसपा ) सुजित यादव, किशोर वाघेला,(मा. स्वीकृत नगरसेवक) विक्रम कांबळे, श्रीराम चौधरी, संजय जाधव, बंडू गायकवाड, वल्लभ पिंगळे,डॉ.मयूर गायकवाड ( राष्ट्रवादी कॉंग्रेस ) आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## उरण, पनवेल जेएनपीए परिसरात कंटेनर अपघातांची मालिका

**दि.१९, उरण :** जेएनपीए बंदर आणि परिसरात ये-जा करणारी हजारो जड कंटेनर वाहने बेदरकारपणे हाकली जात आहेत. गेल्या दोन दिवसांत उरण, जेएनपीए आणि पनवेल येथील महामार्गावर तीन अपघात झाले आहेत. यात जीवितहानी टळली असली तर लहान वाहनांचे नुकसान झाले आहे. जेएनपीए बंदरातून दररोज १५ हजारापेक्षा अधिक जड कंटेनर वाहने उरणच्या जेएनपीए बंदर ते पळस्पे व जेएनपीए ते आम्रमार्ग नवी मुंबई या दोन्ही राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक करीत आहेत. यातील अनेक वाहने ही बेदरकारपणे वाहतूक करीत आहेत. याचा फटका या मार्गावरून प्रवास करणाऱ्या दुचाकी व हलक्या वाहनांना बसत आहे. त्यामुळे अनेक वाहनांना या कंटेनर वाहनांकडून धडका दिल्या जात आहेत.




## कर्मयोगी

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला.

**आज त्यांची ६८ वि पुण्यतिथी,**
**त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!**

# देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती !

मा.प्रतिभाताईंनी आपल्या जीवनाची सुरुवात समाजकार्याने केली व नंतर गांधीवादी विचारामुळे राजकारणात सक्रिय सहभागी झाल्या. अशा त्या ठराविक राजकिय व्यक्तींपैकी आहेत. त्यांचा राष्ट्रपती पदाचा कार्यकाळ इतर राष्ट्रपतींच्या तुलनेने निकृष्ट दर्जाचा आणि स्वप्रेमासाठी कार्यरत, असा कुप्रसिद्ध आहे. त्यांच्या समाजकार्यात प्रारंभिक काळात त्यांनी गरीब व निराधार महिलांसाठी महाराष्ट्रात वसतिगृहे काढली होती. ही त्यांची खुप जमेची बाजू आहे. त्याचबरोबर राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळात कुटुंबियांसह जगभरात भ्रमंती करण्यासाठी त्या ओळखल्या जातात. प्रतिभाताई पाटील यांनी एकूण १५ पुस्तके लिहिली आहेत. त्यांत मराठीतील- भारत जागवा, हिंदीमधील- भारत जगाओ या पुस्तकांचे प्रत्येकी ६ खंड, जब मैं राष्ट्रपति थीं- २ खंड आणि स्त्री उत्कर्ष की ओर या पुस्तकांचा समावेश आहे. या पुस्तकांमध्ये प्रतिभाताईंनी देश-विदेशांत दिलेली हिंदी, मराठी व इंग्रजीतील भाषणे तथा अन्य व्याख्याने समाविष्ट करण्यात आली आहेत. राष्ट्रपतींना निवृत्तीनंतर मिळणाऱ्या घरासाठी ज्याची कमाल मर्यादा २००० वर्ग फुट असते, त्यात त्यांनी सैनिकांसाठी आरक्षित पुणे येथील २ लक्ष वर्ग फुट जागा घेतली. यावर टिका झाल्यानंतर मात्र त्यांनी ६००० वर्ग फुटावर बंगला बांधला आहे.

मा.प्रतिभाताईंच्या राष्ट्रपती कारकिर्दीत विविध कारणांसाठी त्यांची आलोचाना झाली. काहींचा उल्लेख असा- १. प्रतिभा पाटील यांनी आपल्या राष्ट्रपतीपदाच्या कारकिर्दीत अनेक गुन्हेगारांचे निर्घृण गुन्हे माफ केले. त्या आजवरच्या सगळ्यांत दयाळू राष्ट्रपती ठरल्या. त्यांनी ३५ निर्घृण गुन्हेगारांची फाशीची शिक्षा रद्द करून ती जन्मठेपेवर आणली. आधीच्या ३० वर्षांत मंजूर करण्यात आलेल्या दयेच्या अर्जांच्या तुलनेत हे प्रमाण ९० टक्के होते. त्यांनी महिलांसाठी अनेक उत्तम कामे केली. त्यांच्याच काळात अन्टी रँगिग हा कायदा अंमलात आला व देशातील अत्याचार कमी झाले. २. एका आरटीआयमधून भारत सरकारद्वारे उत्तर देण्यात आले होते. त्यात राष्ट्रपती पदावरुन निवृत्त होत असतांना राष्ट्रपती असतांनाच्या पाच वर्षांच्या काळात त्यांना मिळालेले जवळजवळ सर्व गिफ्ट त्या स्वतःबरोबर घेऊन गेल्या होत्या. हे गिफ्ट त्यांना विदेशी दौऱ्यावर असताना विविध राष्ट्रांच्या प्रधानमंत्री, राष्ट्रपती आणि राष्ट्र प्रतीनीधींकडून मिळालेल्या होत्या. सामान्य स्थितीत राष्ट्रपती जेव्हा त्यांचे पद सोडून जातात, तेव्हा त्यांना राष्ट्रपती असतांना मिळालेले गिफ्ट राष्ट्रपती भवनातच राहू देतात. ३. परिवारासोबत जनतेच्या कष्टाच्या पैश्यावर विदेश यात्रा केल्या. त्या केव्हा केव्हा नातवंडांना तर कधी परिवारातील बाकीच्या लोकांना विदेश दौऱ्यावर घेऊन जात व सर्व प्रवास खर्च, राहण्याचा खर्च टॅक्स पेयार्स गरीब जनतेच्या खिशातून खर्च होत राहिला. त्यांनी त्यांच्या राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळात २२ देशांच्या यात्रा केल्या, चार खंडात प्रवास, १२ विदेशी दौरे केले. भारतीय विदेश मंत्रालयाने त्यांच्या राहण्यात, विदेशामध्ये फिरण्यात तब्बल २०५ करोड रुपये खर्च केले. विदेश तसेच भारतातील त्यांनी चार्टर्ड- खाजगी विमान वापरले. त्यात जनतेचे ३६ करोड व्यर्थ घालवले. त्यांच्या तुलनेत डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलाम यांनी १२ विदेशी यात्रा केल्या होत्या. मा.प्रतिभाताई देवीसिंह पाटील-शेखावत यांचा जन्म दि.१९ डिसेंबर १९३४ रोजी खानदेशातील जळगाव जिल्ह्यात झाला. त्यांनी एम.जे.कॉलेज, जळगाव येथून एम एची पदवी घेतल्यानंतर मुंबईतील लॉ कॉलेजातून एलएलबीची परीक्षा देऊन त्या वकील झाल्या. सन १९६५मध्ये डॉ.देवीसिंग शेखावत यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. एक मुलगा आणि एक मुलगी अशी त्यांना अपत्ये आहेत. त्या एक उत्तम टेबलटेनिस खेळाडू होत्या. त्यांनी राजकारणात येण्यापूर्वी कायद्याचा अभ्यास केला होता. राष्ट्रपती होण्यापूर्वी त्या राजस्थानच्या १६व्या राज्यपाल व प्रथम महिला राजस्थान राज्यपाल होत्या. तत्पूर्वी त्या राज्यसभेच्या उपसभापती व इ.स.१९६२ ते १९८५ दरम्यान महाराष्ट्राच्या विधानसभेत आमदार व विविध खात्याच्या मंत्री होत्या. मा.प्रतिभाताई



**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

पाटील यांची राजकीय कारकीर्द अशी- १. सन १९६७पासून ते १९८५पर्यंत त्या मुक्ताईनगर तालुक्याच्या आमदार राहून त्यांनी मुक्ताईनगर तेव्हाचे एदलाबाद येथील प्रतिनिधित्व महाराष्ट्र विधानसभेत केले. नंतर त्या अमरावतीतून भारतीय लोकसभेत खासदार राहिल्या. त्या राजस्थानच्या गव्हर्नरसुद्धा राहिल्या. इ.स.२००७मध्ये त्यांची भारताच्या राष्ट्रपदी निवड झाली. त्या भारताच्या इतिहासातील प्रथम महिला राष्ट्रपती बनल्या. २. त्या जगातील एकमेवट महिला राष्ट्रपती आहेत, की ज्यांनी एकही निवडणूक हरली नाही. तसेच त्या जगातील एकमेव महिला राष्ट्रपती आहेत, कि ज्यांनी आपल्या राष्ट्रपती कार्यकाळात एक सुखोईसारखे लढाऊ विमान चालवले, तेही वयाच्या ७४व्या वर्षी! जगातील एकमेव महिला राष्ट्रपती ज्यांनी आपल्या देशाची संस्कृती जपत कुठल्याही प्रकारचा राजशिष्टाचार तोडला नाही, एवढ्या त्या आपल्या भारत देशाच्या संस्कृतीचा आदर करतात. ३. इ.स.१९६२साली त्या जळगाव विधानसभा मतदार संघातून निवडून आल्या. त्यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षा म्हणून नियुक्ती झाली. दि.७ जुलै १९६५ला त्यांनी लग्न करून अमरावतीच्या शेखावतांच्या घरात प्रवेश केला व पहिल्यांदाच मंत्री झाल्या. त्यानंतर पुढे सतत वीस वर्षे त्या निरनिराळ्या खात्यांच्या मंत्री होत्या. आरोग्य, पर्यटन, संसदीय कामकाज, गृहनिर्माण, समाजकल्याण व सांस्कृतिक, सार्वजनिक आरोग्य व समाजकल्याण, दारुबंदी व पुनर्वसन, शिक्षणमंत्री, विधान सभेवर फेरनिवड, विधान मंडळ नेतेपदी निवड वगैरे वगैरे. सन १९७९-८० या काळात विधानसभेत विरोधी पक्षनेत्या म्हणूनही त्यांनी काम पाहिले. इ.स.१९८५साली त्या राज्यसभेवर निवडून गेल्या व राज्यसभेच्या उपाध्यक्षा झाल्या. तो त्यांचा कार्यकाल संपल्यावर अमरावतीहून सन १९९१साली प्रथमच त्या लोकसभा सदस्य म्हणून निवडून गेल्या. सन १९८९मध्ये त्या मध्यप्रदेश काँग्रेसच्या अध्यक्षाही होत्या. सन १९७८ला मुक्ताईनगर तेव्हाचे एदलाबाद येथील मतदार संघातून त्या काँग्रेस पक्षाच्या उमेदवार म्हणून निवडून आल्या. नैरोबीत आंतरराष्ट्रीय समाजकल्याण परिषदेस भारत सरकारच्या प्रतिनिधी म्हणून त्या गेल्या होत्या. प्रिटोरिया येथील महिला परिषद, म्युनिक येथील महिलांची जागतिक परिषद, तसेच सन १९८५मध्ये दक्षिण अमेरिकेत बोलेव्हिया येथे झालेली परिषद, अशा सर्व ठिकाणी त्यांनी देशाचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी महिला आर्थिक विकास महामंडळ स्थापून स्त्रियांना चरितार्थाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. पाळणाघर मदत योजना स्थापन केली. महिला बँकांची स्थापना केली. आदिवासी विकास योजना, वसंतराव नाईक महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ आणि जोतिबा फुले महामंडळ आदींची स्थापना केली. जळगाव येथे एक सुसज्ज रुग्णालय उपलब्ध करून दिले. अंधांसाठी संस्था काढून कार्य उभे केले. जळगाव येथे इंजिनियरिंग कॉलेज काढले.

**!! आज आपणास वाढदिवसानिमित्त निरामय जीवनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**



## बाबा आपले ..

गाडगे बाबा आपले
किर्तन मधूर चांगले
सामान्य जन सगळे
किती सहज गुंगले

भाषा बोली व-हाडी
शब्द शब्द ते कळले
बाबाकसे आपणाशी
नाते हळूवार जुळले

का शिकावे मानवाने
नीट आता समजले
सावकारी कर्जवाईट
कारण छान उमजले

जाती भेद क्रुर रूढी
कुंपण मोडुन काढले
गाव गल्ली मोहल्ले
स्वच्छ लख्ख झाडले

मन सुध्दा साफ केले
मित्र असंख्य जोडले
आपणचं करू सुधार
कर्तव्यआपले ताडले

गाडगेबाबा मना मना
सर्वत्र तुम्हां पाहिले
देव खराचं माणसात
हृदय सुखात न्हाहिले

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# जयगड वायू गळती प्रकरणानंतर पंचक्रोशीतील ग्रामस्थ आक्रमक

## पोलीस ठाणे, कंपनीवर धडक मोर्चा !



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१८, रत्नागिरी :** जयगड येथील वायू गळती प्रकरण आता चिघळताना दिसत आहे. वायू गळतीने विद्या मंदिर, जयगड मधील ६८ विद्यार्थीना

श्वासनाचा त्रास झाल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याचे अद्यापही दुष्परिणाम भोगावे लागत आहेत. आता या प्रकरणात ग्रामस्थ आक्रमक झाले असून त्यांनी कंपनी व्यवस्थापन आणि जयगड पोलीस ठाण्यावर १८ डिसेंबर २०२४ रोजी धडक मोर्चा काढला. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

जयगड पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ, जयगड यांनी या संदर्भात एक बैठक घेऊन कंपनी व्यवस्थापनाला एक निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी मुलांच्या आरोग्यविषयक सुविधांची मागणी केली आहे.

**मागण्या पुढील प्रमाणे**

१) जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांकडून मेडिकल रिपोर्ट मागणी करणे.
२) शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांचा कायम स्वरुपी मेडिक्लेम करणे.
३) भविष्यात उद्भवणा-या सर्व आजारांची जबाबदारी कंपनीने घेणे.
४) शाळेच्या आवारात सुसज्य रुग्णवाहिका व त्याच बरोबर तज्ञ डॉक्टर कायम स्वरुपी उपलब्ध ठेवणे.
५) विद्याथी, शिक्षक व कर्मचा-यांची आरोग्य तपासणी वेळच्यावेळी करावी.
६) कंपनीने गॅस वाहतूक व गॅस साठवणूक त्वरीत बंद करावी.
७) कंपनीकडून १०० बेडचे सुसज्य हॉस्पीटल तयार करणे.
८) उर्जा हॉस्पीटलमध्ये तिनही शिपट मध्ये तज्ञ डॉक्टर उपस्थित असावेत.
९) डॉक्टर कुंभार यांना उर्जा हॉस्पीटलमधून काढून टाकणे.
१०) उर्जा हॉस्पीटलमध्ये तज्ञ नर्सेस नियुक्त करणे.
११) डॉक्टरांच्या नावाची व वैद्यकिय पदवीची पाटी लिहीलेली असावी.
१२) यापुढे विद्यार्थ्यांना व शिक्षकांना उद्भणा-या आजारांसाठी सरकारी हॉस्पीटल मध्ये दाखल न करता खाजगी मध्ये दाखल केल्यावर त्याचे वैद्याकिय बिल मिळावे.
१३) दिनांक १२ डिसेंबर २०२४ रोजीच्या वायु गळती घटनेशी संबंधीत बाधीत विद्यार्थ्यांना हॉस्पीटलचा व पालकांचा वैयक्तिक खर्च कंपनीकडून मिळावा.
१४) बाधित विद्यार्थ्यांचे काही पालक, जे.एस.डब्ल्यू. कंपनीमध्ये कर्मचारी असल्यामुळे, ते मुलांसोबत असल्यामुळे गैरहजर दिवसांचाही पगार मिळावा.
१५) बाधित विद्यार्थ्यांचे पालक जे इतरत्र काम करत आहेत. त्यांनाही आर्थिक मोबदला मिळावा.
१६) विद्याथ्यर्थ्यांचे आरोग्य सुदृढ रहाण्यासाठी सकस आहाराची व्यवस्था करण्यात यावी.

# महाराष्ट्र विद्यालय सिल्लेवाडा येथे ग्रंथालयाचे उदघाटन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१९, नागपूर :** वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेड, नागपूर द्वारा प्रायोजीत ग्रंथालयाचे उदघाटन क्षेत्रीय प्रबंधक नागपूर विभाग सुनीलकुमार यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य राम पिल्लेवान होते तर संस्था सचिव सुहासताई केदार या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

तसेच विशेष अतिथी म्हणून वेस्टर्न कोलफिल्ड लिमिटेडचे अधिकारी रानु रंजन, उपक्षेत्रीय प्रबंधक एस.पी.तिवारी, डॉ.शशिशंकर, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी श्रीरामकुमार, अजय उपाध्याय, सि.एस.आर.प्रमुख, पंकज सिंग, कार्यालय अधीक्षक प्रामुख्याने उपस्थित होते. सर्व




पाहुण्यांच्या हस्ते द्वीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सुनीलकुमार यांनी फित कापून ग्रंथालयाचे उदघाटन केले. ग्रंथालयाचे विद्यार्थ्यांच्या जिवनात किती महत्त्वाचे स्थान आहे याबद्दल मान्यवरांनी मार्गदर्शन केले. सुनीलकुमा यांनी आपल्या जीवनातील अनमोल असे अनुभव, आणि परिस्थितीशी केलेला संघर्ष व त्यातून शिक्षणामुळे मिळालेले समृद्ध जिवन विषद करताना ते अतिशय भावूक झाले.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्यांनी शाळेला पुस्तके, पुस्तकं ठेवण्यासाठी १० कपाटं आणि वाचन करण्यासाठी विद्यार्थ्यांना बसण्यासाठी २० खुर्च्या विद्यालयाला भेट दिल्यात. प्राचार्य राम पिल्लेवान यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुस्तकांचे आणि शिक्षणाचे महत्त्व विषद करताना मान्यवरांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन पर्यवेक्षक अनिता डेहरीया यांनी केले. तसेच आभार राजश्री राऊत यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शरद बोबडे, विजयता उईके तसेच शिपाई प्रवीण दोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मनसे विभाग अध्यक्ष पाटील यांना भूमाफियाकडून जिवे मारण्याची धमकी



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१९, शिळफाटा (ठाणे) :** गेली १२ वर्षापासून अनाधिकृत बांधकामाविरुद्ध आवाज उठवत असलेले सामाजिक कार्यकर्ते व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विभाग अध्यक्ष शरद गुणाजी पाटील यांना भुमाफियानी जिवे मारण्याची धमकी दिली आहे. शिळफाटा येथे शिळफाटा-महापे मार्गावर असलेला लख्खिकंपाऊड मध्ये एक ईमारत कोसळली त्यामध्ये निष्पाप ७४ नागरिकांचा जिव गेला. अशा घटना भविष्यात घडू नये. म्हणून शरद पाटील हे अनाधिकृत बांधकामाच्या विरोधात लढा देत आहे. लख्खिकंपाऊड चे सरकारी साक्षिदार असुन उच्च न्यायालयात याचिका दाखल करुन होणाऱ्या अनाधिकृत बांधकाम बद्दल ठाणे महापालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, वनविभाग तसेच महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना नेहमी निर्दर्शनास आणून देण्यासाठी पत्रव्यवहार करत असतात. महसूल खात्याचा महसूल ही डुबला जात आहे. त्यामुळे करोडो रुपयांचे नुकसान महसूल खात्याचा होत आहे. ही गोष्ट वरिष्ठ अधिकाऱ्यांना निर्दर्शनास आणून देत आहे. सद्या शिळफाटा विभागात मोठ्या प्रमाणात अनाधिकृत बांधकाम चालू असलेल्या बिल्डर लॉबिचे फावले असून अचानक कारवाई झालेल्या बिल्डर माफियांकडून पाटील यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या बद्दल शरद पाटील यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी तयारी वर्तवली आहे.

## बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्या असा ठराव ग्रामसभेत पारित




**अक्षराज : प्रमोद मौळे**

**दि.१९, जव्हार (पालघर) :** नुकतीच तालुक्यातील झाप ग्रामपंचायतची ग्रामसभा लोकनियुक्त सरपंच एकनाथ पांडुरंग दरोडा यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये बालविवाह रोखण्यासाठी चर्चा करण्यात आली. तसेच पूर्ण देशात ईव्हीएम मशीनवर शंका घेतली जात असल्याने निवडणुकांमध्ये पारदर्शकता असावी. यासाठी झाप ग्राम पंचायतचा ईव्हीएम मशीन बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्या. अशी मागणी ग्रामस्थांनी केली व हा ठराव ग्रामसभेत पारित झाला. त्याला उपस्थित ग्रामस्थांनी एकमुखाने मंजूरी दिली आहे. झाप ग्रामपंचायतचा ईव्हीएम मशीन बंद करून बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्यात याव्या. असा ठराव ग्रामसभेत पारित झाला असून झापची ग्रामसभा पार पडली आहे.

## बालरंगभूमी संमेलनासाठी संदेश; विद्यालयातील १५ विद्यार्थ्यांची निवड

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१९, मुंबई :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद संलग्न संस्था बालरंगभूमी परिषद यांच्या वतीने पुण्यातील बिबवेवाडी येथे दिनांक २० ते २२ डिसेंबर २०२४ या कालावधीत पहिले बालरंगभूमी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात बालरंगभूमी परिषद बृहन्मुंबई शाखेचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुल, पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) येथील संदेश विद्यालयातील १५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. शाळेचे संगीत शिक्षक मनोहर म्हात्रे यांचे मार्गदर्शन या विद्यार्थ्यांना लाभले आहे. बालरंगभूमी परिषदेच्या वतीने यापूर्वी आयोजित लोककला महोत्सवांतर्गत झालेल्या स्पर्धेत उत्कृष्ट लोककला सादरीकरण केल्यामुळे शाळेची निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या या निवडीमुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून संस्थेच्या अध्यक्ष पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे व शाळेचे प्राचार्य राजेंद्र म्हात्रे यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष अभिनंदन केले आहे. संमेलनाच्या कलादालनाचे उद्घाटन प्रख्यात चित्रकार अरुण दाभोळकर यांच्या शुभहस्ते होणार आहे. संमेलनात प्रसिद्ध नाट्य निर्माते, कलाकार मंडळी उपस्थित राहणार आहेत. या संमेलनात महाराष्ट्रभरातून दीड हजार विद्यार्थी उपस्थित राहून आपली कला सादर करणार आहेत.

## खा.लंके यांची मंत्री डॉ.विरेंद्रकुमार यांच्याकडे मागणी

### प्रत्येक तालुक्यात दिव्यांगांसाठी शिबिरे घ्या



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने समाजातील दुर्बल घटकांसाठी आयोजित करण्यात येणारी विशेष शिबिरे नगर लोकसभा मतदाररसंघातील प्रत्येक तालुक्यात दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्याची मागणी खासदार नीलेश लंके यांनी सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री डॉ. विरेंद्रकुमार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने समाजातील दुर्बल घटकांसाठी त्यांची कौशल्ये व क्षमता वाढविण्यासाठी तसेच त्यांना राष्ट्रीय प्रवाहात सामील करण्यासाठी विविध योजना व कार्यक्रम राबविले जातात.

या योजना तसेच कार्यक्रम मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यात राबविण्यासाठी अशा शिबिरांचे आयोजन करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्याची मागणी खा. निलेश लंके यांनी केली. या मागणीसंदर्भात खा.लंके यांनी मंत्री विरेंद्रकुमार यांची भेट घेत सविस्तर चर्चा केली. मतदारसंघात आपण गेल्या पाच वर्षात आमदार म्हणून काम करताना दिव्यांग बांधवांसाठी राबविलेल्या विविध योजनांची माहीती मंत्री विरेंद्र कुमार यांना दिली. डॉ. विनयकुमार यांनी खा. लंके यांनी दिव्यांगांसाठी केलेल्या कामाचे कौतुक केले. कोरोना संकटात त्यांनी हजारो रुग्णांना दिलेल्या जीवदानाची ही मंत्री विरेंद्रकुमार यांनी दखल घेत हे काम देशवासीयांच्या कायम स्मरणात राहील अशी टिपन्नी ही केली. खा. लंके यांनी केलेल्या मागणीवर कार्यवाही करण्याची ग्वाही मंत्री विरेंद्रकुमार यांनी दिली.

## कडाक्याच्या थंडीमुळे रब्बी पिके तरारली; वातावरण पिकांसाठी फायदेशीर



बळीराजाला यंदा चांगले उत्पन्न मिळण्याची आशा पावसामुळे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी बहुतांशी शेतकर्यांनी खरीप कामे तातडीने आटपून रब्बी हंगामाला सुरुवात केली आहे. लवकरात लवकर पेरणी करून जमिनीत असलेल्या ओलाव्याचा फायदा घेण्यासाठी शेतकर्यांनी रब्बी पिकासाठी लगबग सुरू केली आहे. यंदा रब्बी पिकातून चांगले उत्पन्न मिळण्याची आशा शेतकऱ्यांना आहे. रब्बी पिके ही शेतकऱ्यांच्या फायदेशीर व उत्पन्न वाढीसाठी फायदेशीर ठरत आहे. त्यामुळे शेतकर्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. असेच वातावरण भविष्यातही राहू दे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. रब्बी पिकांसाठी हा हंगाम चांगला आहे. थंडीचे वातावरण रब्बी पिकांसाठी पोषक आहे. या वातावरणात गहू,ज्वारी, हरभरा, कांदा, वाटाणा इत्यादी पिके घेतले जातात. हवेतील गारवा यामुळे जमिनीत ओलावा असल्याने पिके जोर धरू लागली आहेत. असेच वातावरण राहिले तर रब्बी पिके चांगली येतील.

**- सोमनाथ बांडे, प्रगतशील शेतकरी, टाकळी ढोकेश्वर**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, अहिल्यानगर :** जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, ढवळपूरी, वनकुटे, कान्हुर पठार या भागात पडत असलेली कडाक्याची थंडी रब्बी पिकांसाठी फायदेशीर ठरत आहे. थंडीमुळे पोषक वातावरण व जमिनीत असलेला ओलावा टिकून राहत असल्यामुळे रब्बी पिकांसाठी हे फायदेशीर व पोषक ठरत आहे. त्यामुळे रब्बी पिके तरलेली आहेत.

बहुतांश शेतकर्यांनी केली पेरणी अवकाळी पावसाचा भरवसा नसल्याने पारनेर भागात खरीप हंगाम लवकर आटपून रब्बीसाठी बहुतांशी शेतकर्यांनी पेरणी केलेली आहे.

तसेच, काही ठिकाणी बहुतांशी पिकांची अर्धवट वाढ झालेली आहे. गहू, ज्वारी, हरभरा, कांदा व वाटाणा यासारख्या रब्बी पिकांसाठी सध्याचे वातावरण चांगले असल्याचे शेतकर्यांनी सांगितले.

## जाधवर इन्स्टिटयूटस तर्फे आदिवासी बांधवांना वस्त्रदान

### विद्यार्थ्यांनी गोळा केलेल्या 10 हजार कपड्यांची मदत




**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.१९, खडकवासला (पुणे) :** आदिवासी व ग्रामीण भागातील कुटुंबांचा कडाक्याच्या थंडीपासून बचाव व्हावा. या उद्देशाने नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या १० हजार कपडयांची मदत आदिवासी बांधवांना पाठविण्यात आली. सत्या फाउंडेशन, पुणे च्या सहकार्याने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जाधवर इन्स्टिटयूटच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला सत्या फाऊंडेशनच्या गीतांजली जाधव, जाधवर इन्स्टिटयूटचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते कपडयांनी भरलेल्या टेम्पोला हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

गीतांजली जाधव म्हणाल्या, कोणतेही पाठबळ, आर्थिक मदत नसताना झोमॅटो सारख्या कंपनीमुळे पुणे आणि लगतच्या परिसरात जवळपास ७० ते ७५ लाख रुपयांचे धान्य वाटप आम्ही करू शकलो. भोर, वेल्हे पानशेत, आंबी यासह अनेक ठिकाणच्या आदिवासी पाड्यांमध्ये धान्य वाटपासोबतच कपडे व इतर वस्तूंचे वाटपही फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

माझ्यासारख्या एका सामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबातील महिलेला समाजातील सर्व घटकांमधून मान्यता आणि प्रोत्साहन मिळाल्याने आणखी समाजोपयोगी कार्य करण्यास प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, समाजातील गरजू घटकांना विविध योजनांच्या माध्यमातून मदत देण्याकरिता शासनाच्या सर्व यंत्रणा कार्यान्वित असतात. मात्र, सामाजिक संस्थांसह सामान्य नागरिक म्हणून आपलीही जबाबदारी आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणिव निर्माण करण्याचा प्रयत्न यानिमित्ताने करण्यात आला. विद्यार्थ्यांनी चांगले कपडे गोळा करुन गरजूंपर्यंत पोहोचविण्याच्या उपक्रमात मोठा वाटा उचलला आहे.

## बिलोली तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने संतोष देशमुख हत्ये प्रकरणी निषेध

### घटनेचा तपास एस.आय.टी मार्फत करण्याची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१९, मुदखेड (नांदेड) :** मसाजोग ता.केज जि. बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करणाऱ्या मुख्य आरोपींसह हा कट रचणाऱ्या मुख्य सूत्रधाराचा तपास एसआयटी मार्फत निपक्षपाती चौकशी करुन देशमुख कुटुंबियांना योग्य न्याय द्यावा यांसह विविध मागण्यांचे निवेदन सकल मराठा समाज तालुका बिलोली च्या वतीने मुख्यमंत्र्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आले. मसाजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे दि.०९ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली.

सदरील खून हा एकट्या संतोष देशमुख चा नसून कायदा आणि सुव्यवस्थेचा व या राज्यातील व्यवस्थेचा आहे. अतिशय निर्दयीपणे जबर मारहाण करीत लाईटर ने डोळे जाळून शरीराची छिन्न छिन्न अवस्था करीत हत्या करण्यात आली. ही माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली.

या घटनेचा सकल मराठा समाज तालुका बिलोली च्या वतीने निषेध करुन विविध मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे तहसिलदार गजानन शिंदे यांच्या मार्फत गुरुवार, दि.१९ डिसेंबर रोजी देण्यात आले या हत्येमागे दडलेल्या सर्व गुन्हेगारांना तात्काळ अटक करावी. आरोपींना पाठीशी घालून जिल्ह्यात दहशत करू पाहणाऱ्या राजकीय नेत्यांना सरकारने पाठीशी न घालता सदरील गुन्ह्याचा तपास हा एस.आय.टी मार्फत निपक्षपाती पणाने करण्यात यावे. चौकशी अंतिम सदरील खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून पीडित कुटुंबीयांना तात्काळ न्याय द्यावा, दोषी आरोपींवर कडक शासन करण्यासाठी विशेष तपास यंत्रणा एस आय टी नेमण्यात यावी, पीडित कुटुंबाला पोलीस संरक्षण देऊन त्यांचे तात्काळ पुनर्वसन करण्यात यावे. अशा विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. तसेच या मागण्यांची चालु हिवाळी अधिवेशनात अंमलबजावणी करावी. अन्यथा मागण्यांची पूर्तता नाही झाल्यास काही दिवसात बिलोली तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात विविध मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा सदर निवेदनाद्वारे देण्यात आला.

यावेळी राजू पाटील शिंपाळकर, गंगाधर पा.नरवाडे, संतोष पा.आगळे, संतोष पा.चव्हाण, प्रताप पा.शिंदे, चक्रधर पा.टेकाळे, बाजीराव पा.जाधव, मारोती मालुसरे, साईराज रुद्रुरकर, रवि पा.जाधव, देवराव शिंदे, बळवंत पा. लुटे, दत्ता जाधव, हानमंत कदम, पंकज रामपुरे, गंगाधर पवार यांच्यासह अनेकांच्या सह्याचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले.

## डॉ.मिलिंद आंबेरकर राज्यस्तरीय महाराष्ट्र उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार २०२४ ने सन्मानित




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१९, बदलापूर (ठाणे) :** प्रेरणा फाऊंडेशन व प्रेरणा नाट्य मंडळ रंगमंच महाराष्ट्र तर्फे दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून वेगवेगळे पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येतो. यावर्षी डॉ.मिलिंद बच्चू आंबेरकर यांनी केलेल्या कार्याची दखल प्रेरणा फाऊंडेशन व प्रेरणा नाट्य मंडळ महाराष्ट्र अध्यक्ष प्रेरणा उर्फ दीप्ती वैभव कुलकर्णी आणि टीमने घेतली आणि या वर्षीचा राज्यस्तरीय महाराष्ट्र उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार २०२४ ने डॉ.मिलिंद बच्चू आंबेरकर यांनासन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सोहळानुकताच बल्लाळेश्वर मंगल कार्यालय, भारत कॉलेज रोड, हेंद्रे पाडा बदलापूर पश्चिम येथे पार पडला. या पुरस्कार सोहळ्याला प्रेरणा फाऊंडेशन आणि प्रेरणा नाट्य मंडळ रंगमंच महाराष्ट्र दीप्ती उर्फ प्रेरणा वैभव कुलकर्णी यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून मिलिंद फाउंडेशन चा सदस्या मिताली आंबेरकर यांनाही राज्यस्तरीय महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट समाजसेविका २०२४ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तसेच मिलिंद फाउंडेशनचे सचिव सिद्धेश रमेश रावळ आणि खजिनदार प्रणिता परशुराम गवंडे यांनाही पुरस्कार जाहीर झालेत. तसेच समाजसेवेचे बाळकडू हे डॉ. मिलिंद आंबेरकर यांना त्यांच्या घरातूनच म्हणजेच त्यांचे वडील बच्चू मुकुंद आंबेरकर संस्थापक उपाध्यक्ष आणि आई वैशाली बच्चू आंबेरकर संचालिका यांच्याकडून मिळाले.

तसेच मिलिंद फाउंडेशन संचालक मुकुंद आंबेरकर आणि परशुराम प्रभाकर गवंडे आणि सुषमा सिद्धेश रावळ यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. तसेच राज्यस्तरीय उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार मिळाला बद्दल समाजातील सर्व स्तरातूनमिलिंदआंबेरकरत्यांच्यावर आशीर्वाद स्वरूपी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## राजेंद्र विद्यालयात अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१८, खंडाळा (सातारा) :** बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी राजेंद्र उच्च माध्यमिक विद्यालय खंडाळा या ठिकाणी अल्पसंख्यांक हक्क दिनचा कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमप्रसंगी प्रमुख वक्त्या प्रा.शितल कोंढाळकर यांनी अल्पसंख्यांक दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य शब्बीर नालबंद यांनी अल्पसंख्यांकांच्या हक्कांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अल्पसंख्यांक दिनसाजरा केला जातो.

अल्पसंख्याकांनी आपल्या हक्कांबाबत जागृत राहून प्रगती करावी असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.प्रवीण बोरगाव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.खांडके यांनी केले आभार प्रदर्शन प्रा. पोपट नेवसे यांनी केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयामध्ये वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

## महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या वतीने विभागीय आयुक्तांना निवेदन



तहसील कार्यालयात प्रलंबित शेतरस्त्यांची प्रकरणे तातडीने निकाली काढा,शिव पानंद रस्त्यांसाठी भूमि अभिलेख कार्यालयाने मोजणी शुल्क आकारू नये. पोलीस प्रशासनाने संरक्षण शुल्क आकारू नये, महसूल, भूमि अभिलेख कार्यालयामध्ये अपुऱ्या मनुष्यबळाची संख्या वाढवून शेतरस्ते खुले करताना होणारी दिरंगाई थांबवा यासह ग्राम शेत रस्ता समित्या स्थापनेचे तातडीने आदेश देऊन शासन निर्णयाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांचा श्वास खुला करा यासंदर्भातील निवेदन महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे शरद पवळे, दादासाहेब जंगले पाटील यांनी नाशिक आयुक्तांना निवेदन देत शाळकरी विद्यार्थी व शेतरस्ते पिडीत शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले.

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१९, सुपा (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेत रस्ता चळवळीच्या वतीने शेतकऱ्यांच्या पिढ्यान पिढ्या सुरू असलेल्या शेतरस्त्यांच्या प्रश्नावर महाराष्ट्र राज्यव्यापी प्रशासकीय न्यायालयीन लढा जनजागृतीरुपी जनआंदोलन उभारून प्रशासनाचे, राज्य सरकारचे लक्ष वेधत राज्यातील तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन देत वेगवेगळी आंदोलने निदर्शने करत ग्रामीण भागातील गावागावातील वाडी वस्तीवरील शाळकरी विद्यार्थी, अपंग, शेतरस्ते पिडीत शेतकरी यांचा शेतरस्त्यांच्या कारणामुळे होणारा जीवघेणा प्रवास थांबावा.

यासाठी शासन निर्णयाची अंमलबजावणी व हायकोर्टाच्या आदेशाचे पालन व्हावे. तातडीने ग्राम शेरस्ता रस्ता समित्या स्थापन करून गावागावात निर्माण होणारे रस्त्याबाबतचे वाद गावपातळीवर समुपदेशन करून सामोपचाराने मिटवणे, शेतरस्त्यांच्या प्रकरणावरून होणारे वाद शेतकऱ्यांची बैठक घेऊन सोडवणे, वाद न मिटल्यास तहसीलदारांकडे प्रकरण सादर करणे, शेतकऱ्यांसाठी नवीन रस्त्याची मागणी असेल तर महसूल अधिनियम १९६६ च्या कलम १०३ अन्वये तहसीलदारांकडे मागणी करणे समितीच्या बैठका घेऊन त्याचे अभिलेख तयार करणे असे असूनही या समित्या गठीत व कार्यरत नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या शेती पडीक असणे शेतात बांधावरून शेतीपूरक औजारे, यंत्रसामुग्री घेवून जाण्यासाठी शेतात पिकलेला शेतमाल डोक्यावरून नेऊन शेती करणे, शेतमाल बाजारात घेवून जाता न येणे यामुळे आर्थिक मानसिक त्रास सहन करत वाद, भांडणे, हाणामाऱ्या करणे, हायकोर्ट कचेऱ्या करणे हे प्रकार सर्रास होत आहेत. यामुळे सततच्या तासाला कंटाळून अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी गमावल्या आहेत.

यामुळे शिव पानंद शेतरस्त्यांच्या हद्द निश्चित व्हाव्यात. वहिवाटेच्या रस्त्यांचे सर्वेक्षण होऊन त्याच्या नोंदी गाव नकाशावर याव्यात. तहसील कार्यालयातील शेतरस्ता प्रकरणे तातडीने निकाली काढावी. नकाशावरील सर्व शेतरस्त्यांची नंबरी लावून नंबरी हटवणारांना दंड चालू करून नंबरींचे सर्वेक्षण सुरू करावे.

अशा विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, सचिन शेळके, भाऊसाहेब वाळूंज, संजय साबळे यांनी नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांना दिले असून लवकरच जिल्हा, तालुका प्रशासणाला आयुक्तांकडून कार्यवाहीचे आदेश देण्याचे आश्वासन शिवपानंद शेतरस्ता चळवळीला देण्यात आले.

## थोडक्यात

### बीएसपी तर्फे परभणी घटनेचा निषेध; मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि१८, ठाणे :** परभणी येथे दिनांक १० डिसेंबर २०२४ रोजी संविधान प्रतिकृतीची तोडफोड केल्या संदर्भात मंगळवार, दि.१७ डिसेंबर २०२४ रोजी बहुजन समाज पार्टी ठाणे जिल्हा तर्फे ठाणे जिल्हाधिकार्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. परभणी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर असणाऱ्या संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड करणाऱ्या मनुवादी प्रवृत्तीच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या आंबेडकरवादी सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या मारहाणीमध्ये मृत्यू झाला. त्याची सखोल चौकशी व्हावी व दोषींवर तात्काळ कारवाई व्हावी, आंबेडकरवादी आंदोलकांवर चुकीच्या पद्धतीने दाखल केलेले गुन्हे मागे घेण्यात यावेत. या मागणीचे निवेदन बहुजन समाज पार्टी, ठाणे जिल्ह्याच्या वतीने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. सदर निवेदन महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील डोंगरे यांच्या निर्देशानुसार ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष भालेराव यांच्या अध्यक्षतेखाली देण्यात आले. त्याचबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घोषणा देऊन सदर घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला. याप्रसंगी ठाणे जिल्हा अध्यक्ष संतोष भालेराव यांच्यासोबत महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य विद्याधर किरतावडे, राजेश चन्ना जैस्वार, माजी महासचिव अशोक गायकवाड तसेच नवी मुंबई अध्यक्ष प्रा.दत्ता हेगडे यांच्यासह बहुसंख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## खोपोली पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

### १० लाख ३८ हजार ४०० रुपये किंमतीचे गहाळ मोबाईल मिळविण्यात खोपोली पोलिसांना यश

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.१८, खालापूर :** खालापूर पोलिस ठाण्यात दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वसामान्य नागरीकांच्या गहाळ झालेल्या मोबाईल फोन्सचा मोठ्या प्रमाणावर खोपोली पोलिसांनी शोध घेवून महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील वेगवेगळया ठिकाणांहून १७८ मोबाईलपैकी १० लाख ३८ हजार ४०० रुपये किंमतीचे एकूण ७१ मोबाईल फोन मिळविण्यात यश मिळाले असून मुळ तक्रारदार, गहाळ मोबाईल मालक यांना कोकण परिक्षेत्र विशेष पोलिस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या हस्ते परत करण्यात आले.

सर्वसाधारणपणे मोबाईल फोन ही प्रत्येक नागरिकांच्या जिव्हाळ्याचीबाब असून मोबाईल फोन ही सद्या चैनीची वस्तू नसून गरजेचे उपकरण झाले आहे. तथापी ब-याचवेळा आपल्याकडून मोबाईल फोन कोठे तरी विसरणे, पडून गहाळ होणे, चोरीस जाणे अशा बाबी होतात. त्याबाबत खोपोली पोलिस ठाण्याकडे २०२४ मध्ये गहाळ झालेल्या मोबाईल फोन्सच्या दाखल झालेल्या तक्रारींचा नव्याने आढावा घेऊन त्यांचा शोध घेण्याबाबत रायगड पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे व अपर पोलिस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांनी आदेश पारित केले होते.

या पार्श्वभूमीवर खालापूर उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम कदम यांच्या सुचनेप्रमाणे खोपोली पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रगटीकरण पथकाचे पोलिस उपनिरीक्षक अभिजीत व्हरांबळे व पो.कॉं. अमोल राठोड यांच्या पथकाने खोपोली पोलिस ठाण्याच्या हद्दीमध्ये जानेवारी २०२४ ते १५ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये गहाळ झालेल्या १७८ मोबाईल फोन्सचा सीआयईआर (उखएठ) या मोबाईल ट्रेस एप्लीकेशन च्या माध्यमातून शोध सुरु केला.




या मोहिमेमध्ये नमूद गहाळ झालेले मोबाईल फोन्स हे पुन्हा ट्रेस करण्यात आले आणि पोलिस ठाण्याकडे दाखल असलेल्या तक्रारींमधील गहाळ झालेले मोबाईल फोन्स हे महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील वेगवेगळया ठिकाणांहून सुमारे ७१ मोबाईल फोन्स हे परत मिळविण्यात खोपोली पोलिसांना यश प्राप्त झाले.पुन्हा हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईल फोन्सची एकूण किंमत ही १० लाख ३८ हजार ४०० रुपये इतकी होत असून सदरचे मोबाईल फोन्स हे कोकण परिक्षेत्र विशेष पोलिस महानिरीक्षक संजय दराडे यांच्या हस्ते खोपोली पोलिस ठाण्याच्या वतीने मुळ तक्रारदार व गहाळ मोबाईल फोन मालक यांना परत करण्यात आले. ही उल्लेखनिय कामगिरी ही पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलिस अधीक्षक अतुल झेंडे, खालापूर उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व खोपोली वरिष्ठ पोलिस निरीक्षक शितल राऊत यांच्या प्रत्यक्ष नेतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोसई अभिजीत व्हरांबळे आणि पोकॉं अमोल राठोड यांनी पार पाडली.

### एम.पूर्व-२ विभागात सांघिक कवायत स्पर्धा संपन्न

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१८, मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम पूर्व-२ गोवंडी/मानखुर्द या विभागामध्ये शारीरिक शिक्षण विभागाच्या सांघिक कवायत स्पर्धा संपन्न झाल्या. शारीरिक शिक्षणाचे वरिष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे, पर्यवेक्षक दत्तू लवटे व कनिष्ठ पर्यवेक्षक किरण इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाल्या. यावेळी कवायत संचलन, लेझीम, आसन नमस्कार आणि फॅन्सी ड्रिल या स्पर्धा घेण्यात आल्या. कुठं या स्पर्धेसाठी विभागातील विविध शाळांमधून ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.फॅन्सी ड्रिल स्पर्धेमध्ये महाराष्ट्र नगर एम पी एस शाळेने प्रथम क्रमांक मिळवला तर महाराष्ट्र नगर मराठी शाळेने द्वितीय क्रमांक मिळवला. संचलन कवायत स्पर्धेमध्ये शहाजी नगर तामिळ क्रमांक-१ या शाळेने प्रथम क्रमांक तर आयोध्या नगर मराठी शाळेने द्वितीय क्रमांक मिळवला.तसेच लेझीम स्पर्धेमध्ये गोवंडी स्टेशन हिंदी शाळेने प्रथम क्रमांक तर आजीज बाग सीबीएससी बोर्डाच्या शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच आसन नमस्कार स्पर्धेमध्ये तुर्भे एम पी एस शाळेने प्रथम क्रमांक तर शहाजी नगर हिंदी शाळेने द्वितीय क्रमांक पटकावला. सर्व विजयी संघातील सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले तर विजयी झालेल्या शाळांना प्रमाणपत्र व आकर्षक ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभासाठी विभागातील मुख्याध्यापक नाडार बालम व पांडे मॅडम तसेच विभाग निरीक्षक सिंधू डावरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विभागातील शारीरिक शिक्षण शिक्षक नारायण जाधव, विजय शेरे, सुरेश दडस, सुनील कदम अनुजा ठाकूर, स्नेहा चासकर यांच्यासह विभागातील सर्व शारीरिक शिक्षण शिक्षकांनी मेहनत घेतली.

## हदगाव तालुक्याचे शिवसेना तालुका अध्यक्ष पद कोणाकडे? ओबीसी की मराठा ?

**अक्षराज: चंद्रकांत भोरे**

**दि.१९, हदगांव (नांदेड) :** हदगाव विधानसभेवर लोकनेते म्हणून ओळख असलेल्या बाबुराव कदम यांनी बाजी मारुन शिंदे सेनेचा झेंडा रोवला. शिवसेनेचे तालुका प्रमुख विवेक देशमुख यांची शिवसेनेच्या जिल्हाअध्यक्ष पदाची जबाबदारी पडल्याने,रिक्त असलेल्या तालुका पदावर कोणाची वर्णी लागणार ? याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे. तिकडे मंत्रीमंडळात ही छगन भुजबळ,



गोपिचंद पडळकर यांना मंत्री पदापासुण दुर ठेवल्याने ओबीसी वर्गातुन प्रचंड नाराजीचा सुर उमटतांना दिसत आहे. त्यामुळे हदगाव तालुक्याचे शिवसेना तालुका प्रमुख पदासाठी ओबीसी वर्गातुन माजी सैनिक अरुण मिटकरे यांचे नाव जोरदार चर्चेत आहे. आता लोकनेते म्हणून ओळख असलेले आमदार बाबुराव कदम कोणाला झुकतं माप देतात. त्यासाठी हदगावच्या जनतेचे लक्ष लागले आहे.शिवसैनिकांमधून सुद्धा अरुण मिटकरेंच्या नावाला पसंती दर्शवण्यात येत असल्याची चर्चा चालु आहे. सध्या या पदासाठी दावा करणारे एकुण शिवसैनिक प्रतिक्षेत असुन,मराठा समाजातुन प्रतिनिधित्व मिळाल्यास माजी खासदार सुभाष वानखेडे यांचे पुतने आबा वानखेडे यांचे नाव तर ओबीसींच्या मतांचा फायदा येणाऱ्या निवडणुकांमध्ये शिंदे गटाला हवा असल्यास ओबीसीमधुन प्रतिनिधित्व दिल्यास अरुण मिटकरे यांचे नाव फिक्स असल्याचे जवळपास निश्चित झाल्याची चर्चा सध्या ऐकावयास मिळत आहे.

### अल्पसंख्याक हक्क दिवस जिल्हाधिकारी कार्यालयात साजरा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१८, ठाणे :** संयुक्त राष्ट्राने दि.१८ डिसेंबर १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्कांचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तुत केला आहे. त्यानिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावे तसेच या बाबतच्या वैशिष्ट्यांची प्रभावीपणे अभिव्यक्ती करता यावी. यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाच्या सूचनेनूसार या दिवसाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी वैभव कुलकर्णी यांनी अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्व समजावून सांगितले. या कार्यक्रमास सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी भरत साळुंखे, मानव विकास विभागाचे अधिकारी दिपाली भोये, लेखा अधिकारी स्मिता पट्टेकर, अल्पसंख्याक कक्षातील सांख्यिकी सहायक सुनिल नाडेकर, महसूल सहायक श्रीमती शितल जाधव व इतर अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

## 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१८, तलासरी (पालघर) :** तलासरी मधील आमगाव-अच्छाड ग्रुप ग्रामपंचायतमध्ये 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा परिषद शाळा अच्छाड इंडस्ट्रीज येथे दिनांक १८ डिसेंबर रोजी सरपंचराजेश थापड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात घेण्यात आले. पर्यावरण जपण्यासाठी स्थानिक पातळीवर जनजागृती करण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला असून या उपक्रमांतर्गत झाडे लावणे व त्यांचे संगोपन, शाळांमध्ये परसबागांची निर्मिती, रोपवाटिका उभारणे, प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन आणि सिंगल युज




प्लास्टिकवर बंदी घालण्यासह अनेक उपक्रम हाती घेण्यात आले. याशिवाय, ई-कचरा व्यवस्थापन, सांडपाण्याचे नियोजन, ध्वनी प्रदूषण कमी करणे आणि फटाक्यांवर बंदी घालण्याबाबत संकल्प करण्यात आले.या कार्यक्रमास स्थानिक तरुणांचा सक्रिय सहभाग लाभला असून ग्रामपंचायत अंतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांची पर्यावरण दूत म्हणून निवड करण्यात आली आहे.

ग्रामपंचायतीमार्फत सोशल मीडियाच्या माध्यमातून 'माझी वसुंधरा अभियान ५.० ' अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत अशी माहिती आमगाव-अच्छाड ग्रुप ग्रामपंचायतीचे ग्राम विकास अधिकारी उद्धव म्हेत्रे यांनी दिली. तसेच आमगाव-अच्छाड ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत शाळांवर विद्यार्थ्यांसाठी निबंध, चित्रकला स्पर्धा आणि जनजागृती उपक्रमांद्वारे पर्यावरण संरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. विविध उपक्रम राबविण्यास केंद्रप्रमुख नीता देसले तसेच आमगाव-अच्छाड ग्रुप ग्राम पंचायत अंतर्गत येणाऱ्या शाळेतील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. ही सर्व कामे स्थानिक पातळीवर पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून ग्रामस्थांनी या उपक्रमांना भरभरून प्रतिसाद दिला आहे.

### समता विद्या मंदिर शाळेचा क्रिडा महोत्सव उत्साहात साजरा

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१८, मुंबई :** समता विद्या मंदिर साकीनाका शाळेचा वार्षिक क्रीडा महोत्सव २०२४-२५ उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव राजेश सुभेदार यांच्या मार्गदर्शनाखाली माणिक लाल ग्राउंड येथे आयोजित करण्यात आला. या



कार्यक्रमाच्या उद्धाटनासाठी राष्ट्रीय कबड्डी खेळाडू व छत्रपती पुरस्कार विजेते रवि करमरकर यांच्या हस्ते उद्धाटन करण्यात आले. तीन दिवसीय क्रीडा महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.

त्यामध्ये कबड्डी, खो-खो, लंगडी, धावणे, गोळा फेक, दोरी उडी, कॅरम, बुद्धिबळ यांसारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. शालेय स्पर्धेतील विशेष आकर्षण म्हणजे पालकांसाठी संगीत खुर्ची घेण्यात आली. शेवटच्या दिवशी विजेत्या खेळाडूंचा बक्षिस समारंभ ठेवण्यात आला .ह्या कार्यक्रमाला राष्ट्रीय खो-खो खेळाडू नरेंद्र कुंदन यांनी हजेरी लावली. नरेंद्र कुंदन यांच्या हस्ते विजेता खेळाडूंना प्रमाणपत्र व ट्रॉफी देण्यात आली.